# दुष्काळग्रस्तांनी परीक्षा शुल्क परत घेऊन जावे
# बलभीमचे प्राचार्य डॉ. वसंत सानप यांचे आवाहन

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार आणि सहसंचालक उच्च शिक्षण, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील अवर्षणग्रस्त / टंचाईग्रस्त भागातील ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले आहे. या परीक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयास प्राप्त झाली आहे. सदरील पात्र विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयातील सूचनाफलकावर लावण्यात आली आहे. तरी बलभीम महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मध्ये प्रवेशित कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील ई. बी. सी. धारक विद्यार्थ्यांनी आपली ओळख पटवून सदरील परीक्षा शुल्क महाविद्यालयातील लेखा विभागातून घेऊन जावेत असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सानप यांनी केले आहे.